# किशोरवयीन मुलांनी आशय तयार करण्याबाबत

# कुटुंब मार्गदर्शक

→ पालकांसाठी टिपा

common sense networks™ यांच्याशी भागीदारीत YouTube



**डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या जगात, किशोरवयीन मुले फक्त आशयाचे ग्राहक नसतात—ती आशय निर्माणकर्तेदेखील असतात.**

व्हिडिओ तयार करणे हा त्यांच्यासाठी त्यांची स्वारस्ये एक्सप्लोर करण्याचा, स्वतःला व्यक्त करण्याचा आणि कनेक्शन तयार करण्याचा एक मजेदार मार्ग आहे. तसेच पालकांना सहभागी होता येण्याचे अनेक मार्ग आहेत. तुमच्या किशोरवयीन मुलांचे ऑनलाइन जग थोडे आणखी सकारात्मक, आणखी बरेच सुरक्षित तसेच भरपूर मजेदार बनवण्यासाठी या चेकलिस्ट वापरा!

## स्वास्थ्य

निकोप डिजिटल सवयींना प्रोत्साहन देणारे आणि तुमच्या किशोरवयीन मुलाच्या एकंदर स्वास्थ्याला प्राधान्य देणारे साहाय्यकारी वातावरण तयार करा. आनंदी असणे आणि मजा करणे या सारख्याच गोष्टी आहेत!





# किशोरवयीन मुलांनी आशय तयार करण्याबाबत

# कुटुंब मार्गदर्शक

→ पालकांसाठी टिपा

common sense networks™ यांच्याशी भागीदारीत YouTube

### सकारात्मक समुदाय तयार करा

**समानुभूतीसह निर्मिती करा**
त्यांचे व्हिडिओ आणि टिप्पण्या कशा स्वीकारल्या जातील हे विचारात घ्या.

**समावेशक व्हा**
त्यांचा आशय कोणालाही अपमानित करत नाही किंवा वगळत नाही हे कन्फर्म करा.

**गंभीरपणे विचार करा**
ते म्हणत/शेअर करत असलेले खरे असल्याची खात्री करण्यासाठी चुकीची माहिती डिटेक्ट करा.

**सायबर छळणूक रोखा**
छळणूक आणि डिजिटल स्वरूपातील संघर्ष टाळण्याची (किंवा त्याची तक्रार करण्याची) त्यांना आठवण करून द्या.

## नागरिकत्व

तुमच्या किशोरवयीन मुलाला चांगला डिजिटल नागरिक होण्यासाठी सक्षम करा, जो त्यांच्या कृतींचा स्वत:वर आणि इतरांवर होणारा परिणाम विचारात घेईल.

## सुरक्षितता

त्यांच्या आशय निर्मितीच्या प्रवासामधील सहयोगी म्हणून, तुम्ही त्यांच्या सर्जनशील अभिव्यक्तीची जोपासना करत असतानाच त्यांच्या सुरक्षिततेला आणि गोपनीयतेला प्राधान्य देण्यात त्यांना मदत करू शकता.

### गरजेपेक्षा जास्त शेअर करण्यापासून सावध रहा

**सीमा निश्चित करा**
कोणती माहिती शेअर करण्यासाठी सुरक्षित आहे किंवा नाही याबाबत चर्चा करा.

**गोपनीयता सेटिंग्ज चे पुनरावलोकन करा**
त्यांचे व्हिडिओ कुठे दिसतील आणि ते कोण पाहू शकेल हे ठरवा.

**तपशील तपासा**
त्यांचे शब्द, कपडे किंवा स्थाने यांमुळे खाजगी माहिती उघड होत नसल्याची खात्री करा.

**संमती मिळवा**
ते दाखवत असलेल्या किंवा उल्लेख करत असलेल्या सर्वांनी ओके दिला असल्याचे कन्फर्म करा.

**परिणाम विचारात घ्या**
थांबणे >जोखमीचे मूल्यांकन करणे >निर्णय घेणे हे करण्याची त्यांना आठवण करून द्या

पूर्ण <u>किशोरवयीन मुलांनी आशय तयार करण्याबाबत कुटुंब मार्गदर्शक</u> यामध्ये अधिक जाणून घ्या.